### पोलीस प्रशासनाच्या आवाहनानंतर

# दोन दिवसानंतर परळी बाजारपेठ उघडली



गणेश आदोडे । परळी

संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराड यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर कराड यांच्या समर्थनार्थ परळी तालुक्यात परळी शहर, सिरसाळ, धर्मापुरी प्रचंड प्रमाणात तणावग्रस्त वातावरणात बंद पाळण्यात आला. काल बीड न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कस्टडी दिल्यानंतर रात्री परळी पोलीसांकडून भोंगा फिरवून व्यापाऱ्यांना आवाहन करत आपले व्यापार, उद्योग धंदे चालू ठेवावे असे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे परळीतील पोलीसांना दिलासा मिळाला आणि अखेर आज दोन दिवसानंतर परळीतील बाजारपेठ उघडल्याचे दिसून आले आहे.

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर जिल्ह्यामध्ये प्रचंड तणावग्रस्त वातावरण निर्माण झालेले आहे. दररोज काही ना काही गोष्टी घडत असताना महाराष्ट्रात ठिकठिकाणी आक्रोश मोर्चा चालू आहे. विरोधक सत्तेतील लोकप्रतिनिधी रोज नवीन आरोप करीत असताना दोन दिवसांपूर्वी वाल्मिक कराड यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल केल्यानंतर प्रचंड तणाव जिल्ह्यात निर्माण झाला. विशेष करून परळी मतदारसंघात अत्यंत परिस्थिती पोलीस प्रशासनाच्या डोळ्यासमोर दिसत असताना नियंत्रणात आणणे अवघड झाले होते. अशातच मकोका अंतर्गत वाल्मिक कराड यांना सात दिवसाची पोलीस कस्टडी काल मिळाल्यानंतर बीड आणि परळी शहरात प्रचंड प्रमाणात वातावरण बिघडले होते. मात्र पोलीस प्रशासनाने सर्व गोष्टीचा विचार करून अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळत सर्व गोष्टी नियंत्रणात आणल्या. मात्र



दोन दिवसांपासून परळीतील बाजारपेठ अत्यंत काटेकोरपणे बंद होती. .

व्यापारी हे दहशतीमध्ये आपल्या उद्योग धंद्याकडे पाहत होते. अशा परिस्थितीत परळीतील व्यापाऱ्यांना पोलीसांनी धीर देण्याचे काम केले. रात्री भोंगा लावून व्यापाऱ्यांना आवाहन करत आपल्या बाजारपेठ उघड्या ठेवा. उद्योग धंदे चालू ठेवा. पोलीस प्रशासन आपल्या सेवेत दक्ष आहे. कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही. परळीसह जिल्ह्यात प्रचंड पोलीस बंदोबस्त आहे. त्यामुळे काळजी करू नका असा धीर दिल्यानंतर परळीतील बाजारपेठ उघडलेली दिसून आली.


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस


Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक १३३ वा ■ गुरूवार १६ जानेवारी २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १७ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 133 ■ Thursday 16 January 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-169/2022-2024


# मंत्री धनंजय मुंडे यांचा परळीत जनता संवाद

## परळी मतदारसंघ व बाहेरून आलेल्या नागरीक,कार्यकर्त्यांशी संवाद साधत कामे समजून घेत मार्गी लावली







परळी (सरकार): राज्याचे नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी परळीत आल्यानंतर प्रभू वैद्यनाथाचे विधीवत पुजन करून दर्शन घेतले आणि आपल्या जगमित्र कार्यालयातून मतदारसंघ व इतर मतदारसंघाच्या बाहेरून आलेले नागरीक, कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत कामे समजून घेतली व ती मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती कारवाई केली आहे. जनता संवादाच्या माध्यमातून मंत्री धनंजय मुंडे यांनी विविध प्रश्न जाग्यावर मार्गी लावत आलेल्या लोकांचे समाधान केले आहे.

परळी मतदारसंघाचे लोकप्रिय मंत्री धनंजय मुंडे परळी मतदारसंघात गेल्या दोन दिवसांपासून जनता संवाद करीत आहेत. आज सकाळी प्रभू वैद्यनाथाचे विधीवत पुजन करून दर्शन घेतले आणि जगमित्र कार्यालयात बसून मतदारसंघासह इतर मतदारसंघाच्या बाहेरून आलेल्या नागरीक, कार्यकर्ते, पदाधिकारी यांचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या. अनेक प्रश्न जाग्यावर बसून सोडविले. त्याच बरोबर मतदारसंघातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांशी संवाद करून विविध विषयावर चर्चा करण्यात आली. मतदारसंघातील प्रश्न, अडचणी सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांना सूचना दिल्या. त्याचबरोबर मतदारसंघातील विविध प्रश्न मार्गी लावण्याबाबत आवश्यक त्या कारवाई केल्या.मंत्री धनंजय मुंडे यांचा जनता संवादात महिला अनेक प्रश्न घेऊन आले होते. हे प्रश्नही या ठिकाणी सोडविण्यात आले.जगमित्र कार्यालयावर मोठ्या प्रमाणात जनता या जनता संवाद ठिकाणी उपस्थित असल्याचे दिसून आले.

# देशभरातील न्यायालयांमध्ये महिलांसाठी शौचालय बांधा,अन्यथा कारवाई

## सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारांना निर्देश

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): देशभरातील न्यायालयीन संकुल आणि न्यायालयीन परिसरात महिला, दिव्यांग आणि तृतीयपंथी व्यक्तींसाठी स्वच्छतागृह बांधण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना दिले. न्यायमूर्ती जे.बी.पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने एका प्रलंबित खटल्यावरून या मुद्द्यावर प्रकाश टाकला.

राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांनी शौचालयाचे बांधकाम, देखभाल आणि इतर सुविधांसाठी पुरेसा निधी द्यावा. तसेच या सुविधांचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी उच्च न्यायालयांकडून एक समिती स्थापन केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.सर्व राज्य




सरकार तथा केंद्रशासित प्रदेश आणि उच्च न्यायालयांना चार महिन्यांच्या कालावधीत या प्रकरणातील स्थिती अहवाल सादर करावा लागेल. न्या. पारडीवाला यांनी इशारा देताना या निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी कारवाई केली जाईल, असे म्हटले.

अनेक न्यायालयांमध्ये महिला न्यायिक अधिकाऱ्यांसाठीही खासगी स्वच्छतागृह नसल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करताना महिला वकील आणि इतर महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय व्हावी असे नमूद केले. महिलांच्या स्वच्छतागृहांमध्ये सॅनिटरी नॅपकिन डिस्पेंसरची सुविधा उपलब्ध करावी. तसेच या सुविधांच्या देखभालीकडे विशेष लक्ष द्यायला हवे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# सैफ अली खानवर हल्ल्यानंतर २ शस्त्रक्रिया!

मुंबई (सरकार): बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर वांद्रे (पश्चिम) येथील त्याच्या राहत्या घरी पहाटेच्या सुमारास जीवघेणा चाकू हल्ला झाला. यात तो गंभीर जखमी झाला. त्याच्यावर लीलावती रुग्णालयात दोन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्याच्या प्रकृतीविषयी लीलावती रुग्णालयातील डॉक्टरांनी महत्त्वाचे अपडेट दिले आहे.

''सैफची प्रकृती आता स्थिर आहे. तो आता धोक्याबाहेर आहे. त्याच्यावर न्यूरोसर्जरी आणि प्लास्टिक सर्जरी करण्यात आली आहे. त्याच्या मणक्यातून अडीच इंचाचा चाकुचा तुकडा बाहेर काढण्यात आला आहे. त्याला ऑपरेशन थिएटरमधून आयसीयूत हलवण्यात आले आहे. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. त्याला एक दिवस त्याला निरीक्षणाखाली ठेवण्यात येईल'', असे लीलावती रुग्णालयाच्या डॉक्टरांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



अभिनेता सैफ अली खानच्या प्रकृतीविषयी माहिती देताना लीलावती रुग्णालयाचे डॉ. नितीन डांगे यांनी सांगितले, अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्यानंतर सैफ अली खानला पहाटे २ वाजता रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या मणक्यात चाकू घुसल्याने त्याच्या पाठीच्या कण्याला मोठी दुखापत झाली. त्याच्या मणक्यात अडकलेल्या चाकू काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याच्या डाव्या हाताला आणखी दोन खोल जखमा झाल्या आहेत. त्याच्या मानेला एक जखम झाली असल्याने त्याच्यावर प्लास्टिक सर्जरी करण्यात आली. त्याची प्रकृती आता पूर्णपणे स्थिर आहे. तो आता बरा होत आहे आणि धोक्याबाहेर आहे.

# 'यूपीएससी'च्या वन विभाग परीक्षेचा निकाल जाहीर!


नवी दिल्ली (वृत्तसंस्था): केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीने भारतीय वनसेवा परीक्षेचा निकाल जाहीर केला. उमेदवार अधिकृत साइट upsc.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन निकाल तपासू शकतात. या परीक्षेत यशस्वी होणार्या उमेदवारांना पुढील निवड प्रक्रियेसाठी पुढील टप्प्यात उपस्थित राहावे लागेल.

यशस्वी उमेदवारांना तपशीलवार अर्ज फॉर्म २ भरावा लागेल. २० जानेवारी ते २७ जानेवारी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत अधिकृत वेबसाइटवर संबंधित अर्ज उपलब्ध असेल. ऑनलाइन फॉर्ममध्ये उमेदवारांना झोन किंवा केडरसाठी त्यांची पसंती सादर करावी लागेल आणि उच्च शिक्षण, विविध क्षेत्रांतील कामगिरी, सेवा अनुभव, ओबीसी प्रमाणपत्र आणि आवश्यकतेनुसार ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, यासाठी संबंधित कागदपत्रे अपलोड करावी लागतील.

आयोगाच्या नियमांनुसार दिलेल्या तारखेनंतर अर्ज किंवा त्याच्याशी संबंधित कागदपत्रे सादर करण्यास कोणताही विलंब झाल्यास संबंधित उमेदवार निवड रद्द होण्यास पात्र ठरेल. उमेदवार उच्च शिक्षण, विविध क्षेत्रांतील कामगिरी, सेवा अनुभव इत्यादींशी संबंधित अतिरिक्त कागदपत्रे/प्रमाणपत्रे देखील अपलोड करू शकतात, अशी माहिती देण्यात आली आहे.

# दोन किंवा दोनपेक्षा अधिक मुले असणारेच स्थानिक निवडणूक लढवू शकतील-मुख्यमंत्री चंद्रबाबु

हैद्राबाद (वृत्तसंस्था): एकीकडे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश, असे बिरुद भारत मिरवत असतानाच दक्षिणीकडील राज्यांतील राजकीय नेते लोकसंख्या वाढीला खतपाणी घालत असल्याचे दिसत आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन.चंद्राबाबू नायडू यांनी दोनपेक्षा अधिक मुलांना



जन्म द्यावा, असा पुनरुच्चार करत आहेत. नायडू यांनी पुन्हा एकदा आपल्या भूमिकेचे समर्थन केले आहे. एखाद्या व्यक्तीला दोनपेक्षा जास्त मुले असतील तरच तो सरपंच, नगरसेवक किंवा महापौर होऊ शकतो, अशी मोठी घोषणा त्यांनी केली आहे. अधिक मुले जन्माला घालण्यास प्रोत्साहित करण्यासाठी राज्यात धोरण राबवले जाईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

# बारामतीच्या धर्तीवरच आपल्या स्वत:च्या मतदारसंघासह मराठवाड्याचा विकास करण्याचा निर्धार-ना.पंकजाताई मुंडे

बारामती (सरकार): बारामतीत विविध विकासकामांच्या उद्घाटनांच्या निमित्ताने आलेल्या राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी बारामतीच्या विकासाची पाहणी केली. बारामती शहरासह मतदारसंघात झालेल्या सर्वांगीण विकासाने त्या भारावून गेल्या. या निमित्ताने त्यांनी बारामती शहरासह बारामती तालुक्यातील विविध विकासकामांना भेट देऊन त्यांची सविस्तर माहिती घेतली.

बारामतीच्या प्रत्येक विकासकामाकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारकाईने लक्ष असते. दादांच्या व्यक्तिमत्त्वातील काटेकोरपणा, शिस्तबद्धता, वक्तशीरपणा, नियोजनबद्धता, झपाटून काम करण्याची पद्धत यांसह खूप काही गोष्टी अजितदादांकडून शिकण्यासारख्या असल्याचे सांगत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तोंडभरून कौतुक केले. बारामतीच्या धर्तीवरच आपल्या स्वतःच्या मतदारसंघासह मराठवाड्याचा विकास करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.



एका वेगळ्या विकासाच्या दृष्टीतून बारामती आणि बारामतीचा विकास बघण्याचा आज योग आला. बारामती मतदारसंघात झालेली विविध विकासकामे, त्यांचा दर्जा हा अत्यंत सुंदर आहे. बारामती मतदारसंघातील प्रत्येक कामावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारकाईने लक्ष असते. त्यांचा दिवस सकाळी सहा वाजता सुरू होतो. प्रत्येक काम नियोजनबद्ध पद्धतीने करण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळेच त्याचे प्रतिबिंब बारामतीतील प्रत्येक विकासकामांमध्ये दिसत आहे, असे पंकजा मुंडे यांनी नमूद केले.

दरम्यान, काटेकोरपणा, वक्तशीरपणा यांसह उपमुख्यमंत्री अजित दादांच्या अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. बारामतीच्या विकासाशी अजितदादांचे वेगळे नाते निर्माण झाले आहे, त्यांच्या प्रदीर्घ अनुभवासह अनेक वर्षे सत्तेत असल्याचा फायदा बारामतीच्या विकासात निश्चित झालेला आहे.

बारामतीत झालेल्या विकासकामांच्या धर्तीवरच माझ्या मतदारसंघासह मराठवाड्याचा विकास करण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन, असे सांगत पंकजा मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह बारामतीच्या विकासाचे विशेष कौतुक केले.

## संपादकीय

# देवेंद्र ते देवा भाऊ!

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होतील असे जर कोणा भविष्यवत्त्याने अथवा राजकीय पंडिताने सांगितले असते तर त्याला सर्वांनी वेड्यात काढले असते. कारण त्यावेळी एकनाथ खडसे, विनोद तावडे, सुधीर मुनगंटीवार आणि त्याहीपेक्षा म्हणजे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन गडकरी अशी दिग्गज नावे ही भाजपाच्या मुख्यमंत्री पदाच्या प्रमुख शर्यतीत असताना भाजपा पक्षश्रेष्ठींनी थेट यापूर्वी कोणतेही मंत्रीपद न भूषवणाऱ्या व संघटनेचे प्रदेशाध्यक्षपद हे एकमेव पद पाठीशी असलेल्या देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली आणि प्रस्थापित राजकीय नेत्यांबरोबरच राजकीय पंडितांनाही आश्चर्याचा मोठा धक्का दिला. तत्पूर्वी म्हणजे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष होण्यापूर्वी भाजपाचे विधानसभेतील एक आमदार होते. १९९९ मध्ये शिवसेना-भाजपा युतीचे सरकार गेल्यानंतर २०१४ पर्यंत म्हणजे तब्बल

१५ वर्षे शिवसेना आणि भाजपाच्या नेत्यांना, आमदारांना महाराष्ट्रात विरोधी पक्ष म्हणूनच प्रमुख्याने काम करावे लागले. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षाचे आमदार म्हणून सरकारवर अधिकाधिक हल्लाबोल करत प्रकाशझोतात राहण्याचा त्या काळात प्रयत्न करत असत. मात्र २०१४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मोठा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी संपादन केला आणि त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाची राजकीय समीकरणे ही झपाट्याने बदलू लागली. महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर सर्वोच्च सत्ता स्थानी अर्थात मुख्यमंत्रीपदी नागपूरकर देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली आणि महाराष्ट्र भाजपाच्या बरोबर देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय भवितव्यालाही मोठी कलाटणी मिळाली. २०१४ ते २०१९ अशी सलग पाच वर्षे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे सर्वात बलवान आणि शक्तिशाली मुख्यमंत्री होते. याचे कारण म्हणजे केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत शक्तिशाली सरकार होते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत की केंद्रीय गृहमंत्री अमित शहा असो किंवा अगदी संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ असो, या सर्वांची एकमुखी आणि एक हाती ताकद ही सर्वार्थाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी ठामपणे उभी होती. अर्थात मुख्यमंत्रीपदाचा अथवा कोणत्याही मंत्रीपदाचा कोणताही अनुभव पाठीशी नसतानाही अभ्यासूवृत्ती, मुसद्दीपणा, राजकीय चातुर्य, कमालीची जिद्द आणि चिकाटी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सत्तेची नशा डोक्यात जाऊ न देण्याची विनयशीलता या स्वभाव वैशिष्ट्यांच्या जोरावर देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ हा त्यांचा मुख्यमंत्री पदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ सहजरित्या यशस्वी पार केला.

अर्थात २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळातले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आता २०२४ या काळातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात जमीन-आस्मानाचा झालेला फरक हा लक्षात घेण्याजोगा आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांच्या काळातील मुख्यमंत्र्यांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये असलेला काँग्रेस राष्ट्रवादीचा विरोधक हा अत्यंत आक्रमकपणे सभागृहात तसेच सभागृह बाहेर देखील सातत्याने व्यक्त होत राहिला. काँग्रेस राष्ट्रवादी या भाजपाच्या परंपरागत राजकीय शत्रूंवर अक्षरशा तुटून पडणारे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राने या काळात अनुभवले. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर महाराष्ट्रात जे काही राजकीय नाट्य घडले हा काळ देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी अत्यंत प्रतिकूल असा काळ होता, मात्र राजकीय स्थिती अनुकूल असो व प्रतिकूल त्या-त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे कमालीचा संयम बाळगत राजकीय शस्त्र परजण्यात देवेंद्र फडणीस हे पारंगत झाले होते. अर्थात तरी देखील हातातोंडाशी आलेले दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद केवळ तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे घेण्याचा एक सात्विक संताप हा सातत्याने देवेंद्र फडणवीस यांच्या बोलण्यातून तसेच त्यांच्या देहबोलीतून या काळात व्यक्त होत राहिला. या काळात विधानसभेचे विरोधी पक्षनेते असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अवमानाच्या मुद्द्यावरून सभागृहामध्ये देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेला संताप हा तर त्यांच्या समोरील माईकची मोडतोड करण्यापर्यंत गेला होता.

स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रती असलेली अपार श्रद्धा हा जरी देवेंद्र फडणवीस यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य घटक असला तरी देखील तत्कालीन परिस्थितीसमोर हतबल, हताश आणि काहीसे विमनस्क स्थितीतील देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राने प्रथमच त्यावेळी पाहिले होते. अर्थात त्यानंतर महाराष्ट्रात शिवसेनेत फूट पडली आणि सत्तांतर झाले आणि जे एकनाथ शिंदे हे २०१४ ते २०१९ या त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कामाची संधी मागत होते त्याच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून काम करण्याची वेळ देवेंद्र फडणवीस यांच्यावर आली होती. त्यावेळी जरी ही बाब त्यांच्या मनाला पटली नसली तरीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची समजूत घातल्यामुळे ते एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये देखील सव्वादोन ते अडीच वर्षे उपमुख्यमंत्री राहिले आणि केवळ उपमुख्यमंत्री म्हणून राहिले नाही, तर एकनाथ शिंदे यांच्या सरकारचे सर्वार्थाने संरक्षक बनले. उत्तम समन्वयक म्हणून त्यांनी या सरकारमध्ये काम केले. अर्थात राजकीय परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरीदेखील मुसद्दीपणा, चतुर राजकीय नेता हा या प्रतिकूल परिस्थितीमधूनही कशाप्रकारे यशाच्या शिखरावर जातो हे देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या अनुभवातून महाराष्ट्रातील प्रस्थापित आणि नवोदित राजकीय नेतृत्वाला दाखवून दिले. २०२४ मध्ये तब्बल तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झालेले देवेंद्र फडणवीस हे आता कमालीचे बदलले आहे. त्यांच्यातील सर्वात मोठा आणि ठळकपणे दिसून येणारा बदल म्हणजे ते कमालीचे शांत आणि संयमी झाले आहेत. यापूर्वीच्या काळात त्यांच्यात दिसणारा आक्रस्ताळेपणा आता पूर्णपणे नाहीसा झाला आहे. प्रसार माध्यमांसमोर व्यक्त होताना मोजक्या आणि कमीत कमी शब्दांमध्ये व्यक्त होण्याची कला ही त्यांनी आत्मसात केली आहे आणि सर्वात मोठा आणि महत्त्वाचा बदल म्हणजे देवेंद्र फडणवीस हे नाव जसे भारदस्त, वजनदार आणि प्रभावी म्हणून या आधीच्या काळात परिणामकारक ठरले. त्याहीपेक्षा देवा भाऊ हे सर्वसामान्य जनतेच्या आपुलकीचे, प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे अधिक प्रतीक ठरले आहेत. त्यांच्यातील हे बदल त्यांना अधिकाधिक परिपक्वतेकडे घेऊन जाणारे तर आहेतच मात्र त्याचबरोबर राज्यातील सर्वसामान्य जनतेशी थेट जोडणारे आहेत.

# जगाला हेवा वाटणारा प्रयागराजमधील महाकुंभ



प्रयागराज, भारतातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र. हिंदू धर्मात विशेष महत्त्व असलेल्या दुर्मीळ अशा महाकुंभ मेळ्याची सुरुवात यंदा प्रयागराजमध्ये झाली आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या संगमावर १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या ४५ दिवसांच्या कालावधीत महाकुंभ मेळा हा हिंदूंचा धार्मिक उत्सव साजरा होत आहे; परंतु या वर्षीचा कुंभमेळा हा निव्वळ कुंभमेळा नसून तो महाकुंभमेळा आहे. १४४ वर्षांतून एकदा येणारा हा एक दुर्मीळ क्षण मानला जातो. दुर्मीळ ग्रहस्थितीमुळे यंदाच्या महाकुंभ मेळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळा असे या कुंभमेळ्याचे वर्णन सध्या केले जाते आहे. दर बारा वर्षांनी हरिद्वार, नाशिक, उज्जैन आणि प्रयागराज या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो. यंदाच्या प्रयागराज कुंभमेळ्यात ४५ कोटींहून अधिक भाविक सहभागी होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असल्याने, त्याची दखल जगभरातील प्रमुख्य देशातील माध्यमांनी घेतली आहे.

महाकुंभ मेळ्यात गेल्या दोन दिवसांत लाखोंच्या संख्येने भाविक याठिकाणी दाखल झाले आहेत. विदेशी भाविकांनाही याची भुरळ पडली असून हा आध्यात्मिक मेळावा ते अनुभवत आहेत. पवित्र स्नान आणि आध्यात्मिक अनुभूतीमुळे विदेशी नागरिक महाकुंभ मेळ्यासह भारताचे कौतुक करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्यासाठी जगभरातून अनेक महिला यात्रेकरू आल्या आहेत. या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने स्वतःला मी खूप भाग्यवान समजते. भक्ती योग आणि सनातन धर्माविषयीचे ज्ञान घेऊन आम्ही येथे आलो आहोत. आता गंगेत स्नान करण्यासाठी, सर्वांसोबत आध्यात्मिक साधना करण्यासाठी उत्सुक आहे, अशी प्रतिक्रिया पेरू देशातील एका यात्रेकरूने वृत्तसंस्थेला दिली आहे. भारताचा आत्मा या क्षणी खूप शक्तिशाली आहे. गुरू आणि शनी एका रेषेत आहेत. महाकुंभ हा केवळ भारतासाठी नाही, तर महाकुंभ सर्व जगासाठी आहे, अशी प्रतिक्रिया अमेरिकेतून आलेल्या एका भाविकांने व्यक्त केली. अमेरिकेतील प्रमुख माध्यम समूहांपैकी सीएनएन वृत्तसंस्थेने 'प्रयागराजमधील महाकुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक कार्यक्रमांपैकी एक आहे. महाकुंभमेळास येणाऱ्या भाविकांची संख्या अचंबित करणारी आहे. महाकुंभमेळ्यात सेलिब्रिटी आणि परदेशी पर्यटक एकत्र येतात', असे वर्णन केले आहे, तर ब्रिटिश माध्यम समूहाचा भाग असलेल्या बीबीसीने या महाकुंभमेळ्याबाबत मानवतेचा सर्वात मोठा मेळावा असल्याचे वृत्तांकन करताना वर्णन केले आहे. वृत्तवाहिनीने प्रयागराजमध्ये विविध देशांतील भाविकांशीही संवाद साधला. अर्जेंटिनातून आलेल्या व्यक्तीने बीबीसीशी बोलताना सांगितले की, प्रत्यक्ष भक्ती काय असते, हे अनुभवण्यासाठी महाकुंभमेळात सहभागी झालो आहे. गंगा नदीने मला बोलावले, म्हणून मी इथे आलो आहे.

अमेरिकेची लोकसंख्या सुमारे ३४ कोटी आहे. त्यापेक्षा जास्त लोक म्हणजे अंदाजे ४५ कोटी उत्तर प्रदेश राज्यात पुढील ४५ दिवसांमध्ये या महाकुंभात स्नान करण्यासाठी पोहोचणार आहेत. सौदी अरेबियातील मुस्लिमांसाठी पवित्र स्थळे असलेल्या मक्का आणि मदीना येथे दरवर्षी हजसाठी जाणाऱ्या २० लाख लोकांपेक्षा कुंभमेळ्यातील संख्या जास्त आहे. त्यामुळे ही संख्या २०० पट अधिक मानायला हरकत नाही. त्यामुळेच हा कार्यक्रम उत्तर प्रदेश सरकारची एक मोठी परीक्षा असणार आहे. केंद्रातील मोदी सरकार आणि उत्तर प्रदेशमधील मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही सरकारकडून या कुंभमेळ्याची चोख व्यवस्था व्हावी याची दक्षता घेतली गेली आहे. उत्तर प्रदेश सरकारकडून महाकुंभासाठी पायाभूत सुविधांपासून स्वच्छतेपर्यंतचे ६ हजार ९०० कोटी रुपयांचे ५४९ प्रकल्प सुरू केले आहेत. त्याचप्रमाणे भाविकांना योग्य माहिती मिळावी यासाठी महाकुंभ-२०२५ च्या लोगोचे अनावरण करून वेबसाइट आणि ॅपदेखील लॉन्च केले. तसेच हे संकेतस्थळ भाविक आणि पर्यटकांसाठी हवाई, रेल्वे आणि रस्त्याने महाकुंभला पोहोचण्यासाठी मार्गदर्शक म्हणून ठरत आहेत. याद्वारे प्रयागराजमधील राहण्याची व्यवस्था, स्थानिक वाहतूक, पार्किंग, घाटांवर जाण्याचे दिशानिर्देश इत्यादींची माहिती उपलब्ध आहे. तसेच स्थानिक आणि जवळपासची आकर्षणे आणि पर्यटन स्थळांचे मार्गदर्शनही यात आहे.

तसेच या महाकुंभमुळे उत्तर प्रदेश सरकारच्या महसुलात २५ हजार कोटी रुपयांची भर पडण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक स्व-मदत गट, कारागीर, हॉटेलवाले, होमस्टे मालक, रेस्टॉरंट ऑपरेटर आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना फायदा होणार आहे. पहिल्यांदाच कोणत्याही घटनेत इतक्या मोठ्या प्रमाणात चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान आणि बायोमेट्रिक ओळख याठिकाणी वापरण्यात येत आहे, ज्यामुळे लोकांची सुरक्षितता सुनिश्चित होण्यास मदत होणार आहे आणि एखादी व्यक्ती हरवल्यास त्यांना शोधणे सोपे होणार आहे. कार्यक्रमादरम्यान लोक स्वच्छ आणि शुद्ध पाण्यात स्नान करतील याची खात्री करण्यासाठी गंगा नदीजवळ पाण्याची गुणवत्ता मोजण्यासाठी यंत्रणा बसवण्यात आली आहे. याशिवाय, १०० खाटांचे एक प्राथमिक रुग्णालय आणि २० खाटांचे दोन रुग्णालये या परिसरात उभारण्यात आली आहेत. श्रद्धेचा भाग म्हणून लाखो हिंदू धर्मिय मोक्ष प्राप्तीची कामना करण्यासाठी आणि पापाचा नाश करण्यासाठी कुंभमेळ्यात डुबकी मारून स्नान करत असले तरी, जगभरातील माध्यमे आता महाकुंभ मेळ्याकडे मोठा इव्हेंट म्हणून पाहत आहेत. गेल्या अनेक वर्षांच्या परंपरेनुसार दर बारा वर्षांनी होत असलेल्या कुंभमेळ्याची चर्चा पूर्वी भारतीयांपुरती असायची. आता विदेशातील अनेक देशांना महाकुंभ मेळ्यातील परंपरा, कथा जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली आहे.

# धनलाभ...



घर हे वास्तुशास्त्रानुरूप असावे. ही आजची नव्हे, तर प्राचीन काळापासूनची पद्धत आहे. घरातील वस्तूंची मांडणी करतानादेखील वास्तुशास्त्राचा आधार घेतला, तर घरामध्ये सुख, समृद्धी, संपत्ती कायम टिकून राहतात. वास्तू विज्ञानानुसार, काही वस्तू घरामध्ये ठेवल्याने कधीही धनाची कमतरता भासत नाही. म्हणून या वस्तू तुमच्या घरामध्ये असायला हव्यात आणि त्याचबरोबर त्या वास्तू विज्ञानाने सांगितलेल्या दिशेला ठेवायला हव्यात. त्यामुळे ज्यांच्या घरामध्ये सतत आर्थिक समस्या असतील, त्यांनी पुढील उपाय करून पाहण्यास हरकत नाही.

वास्तुशास्त्रानुसार, उत्तर दिशा ही जल म्हणजेच पाण्याची दिशा मानली गेली आहे. घरामध्ये या दिशेला पाण्याने भरलेली सुरई किंवा घट ठेवावा. पाणी साठविण्यासाठी घरामध्ये अनेक तऱ्हेची भांडी असली तरी घरामध्ये उत्तर दिशेला एक लहानसा का होईना, पण घट किंवा माठ पाण्याने भरून ठेवावा आणि त्यातील पाणी दररोज बदलत राहावे. त्याचप्रमाणे आपल्या घरामध्ये मनी प्लांट लावावे. हे रोप लावण्यासाठी घरातील आग्नेय दिशा किंवा दक्षिण-पूर्व दिशा शुभ मानली गेली आहे. ही दिशा गणपतीची मानली गेली असून, याचा प्रतिनिधी ग्रह शुक्र आहे. गणेश विघ्नहर्ता आहेत आणि शुक्र समृद्धीकारक आहे. त्यामुळे मनी प्लांट ह्या दिशेला असावे.

प्रत्येक घरामध्ये वास्तुशांतीची पूजा केली जाते. त्यावेळी वास्तू पुरुषाचे पूजन केले जाते. घरामध्ये वास्तू पुरुषाची नियमित पूजा केली जाणे शुभ मानले जाते. तसेच घरामध्ये नऊ पिरॅमिड ठेवल्याने वास्तुदोष दूर होण्यास मदत मिळते. जिथे घरातील सर्व व्यक्ती एकत्र येतात, त्या भागामध्ये हे पिरॅमिड ठेवावेत. याद्वारे सर्व व्यक्तींमध्ये सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो. त्याशिवाय घरामध्ये शांतता आणि समृद्धी नांदते. घराच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी स्वस्तिकाचे शुभचिन्ह असावे. तसेच द्वाराचे वर गणेशाची तांबड्या रंगाची प्रतिमा असावी. घरामध्ये लक्ष्मीच्या मूर्तीबरोबर कुबेराची मूर्ती आणि यंत्र असणे लाभकारी आहे.वास्तुशास्त्रानुसार, वास्तुदोष दूर करण्याकरिता पंचमुखी हनुमानांची प्रतिमा देवघरामध्ये अवश्य असावी. तसेच भगवान विष्णू आणि लक्ष्मी यांच्या प्रतिमांच्या सोबत शंखही असावा. देवघरामध्ये लाल कपड्यामध्ये गुंडाळलेले श्रीफळ, म्हणजेच नारळ असावा. या सर्व वस्तू वास्तुदोष दूर करून घरामध्ये सुबत्ता, समृद्धी आणणाऱ्या आहेत.

# बॅगा आणि प्रवास



कुठल्याही प्रवासाला निघताना बॅग महत्त्वाची असते. बॅगेशिवाय प्रवास अपूर्ण आहे. त्यामुळे बॅगांचा आकार आणि संख्या तसेच बॅगेत राहतील इतकेच कपडे किंवा वस्तू आदी गोष्टींचे नियोजन महत्त्वपूर्ण ठरते.

प्रवासासह अन्य कुठेही जायचे असेल, तर वेगवेगळ्या प्रकारच्या पिशव्या, बॅगा लागतातच. त्यात महागडे कॅमेरे घेऊन फिरायचे असते. त्यासाठी वेगळी खास बॅग असते. पण, ती छोटी बॅगसुद्धा एका मोठ्या बॅगेत आधी बसवून नंतरच बाहेर काढायची असते. मोजक्या आणि नेमक्या सामानात प्रवास कसा करावा, याचे खरे तर क्लासेसच घेतले पाहिजेत या देशात. अनेक जण खूपच अनावश्यक गोष्टी 'लागतील प्रवासात' या बिरुदाखाली सोबत घेऊन ठेवतात. बाहेरच्या कपडयांचे, आतले कपडे, रात्री झोपायच्या कपड्यांचे किती सेट असावेत, याचा नेमका आणि प्रॅक्टिकल विचार आपण जिथे आणि जसे जातोय त्या सोयी-सुविधांचा विचार करून होतोच, असे नाही. बाकीही ब-याच गोष्टी प्रवासात लागणार असतात. त्यात अलीकडे वेगवेगळे चार्जर्स आणि त्यांची विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणं यांचीही मोठी भर पडलेली असते. ते जपून नेणे आले. त्यासाठी वेगळे पाऊच आले. ते जास्त जागा व्यापतात, आपल्या मुख्य बॅगेत. असे सगळे प्रकार घरोघरी अनुभवायला मिळतात.

त्यात खाण्या-पिण्याचे पदार्थ घ्यायचे की नाही, घेतले तर किती आणि कशात असे शेकडो प्रश्न असतात. रोज लागणारी औषधं, क्रीम्स असू शकतात. कोणाच्या मनोरंजनाची काही साधनं जवळ ठेवलेली असतात. फिरायला गेल्यावरसुद्धा काही फंक्शन ठरलेले असते. त्यासाठी ठेवणीतले कपडे न्यायचे असतात. त्यांची उठाठेव आणखीनच वेगळी. कोणाला गिफ्ट्स घेऊन जायचे असतात आणि कोणी दिलेल्या गिफ्ट्स, माहितीपत्रके हे नव्याने आपल्या बॅगेत सामावले जाणार असतात. त्यांना थोडी मोकळी जागा ठेवावी लागते. पादत्राणंसुद्धा वेगवेगळी हवी असतात सोबत. ती स्वच्छ धुतलेल्या ड्रेससोबत तशीच ठेवायची नसतात. त्यांना वेगळे ठेवायचे असते. अशा कितीतरी गोष्टी एकेका प्रवासासाठी लागत असतात.

इतके सगळे सामान एकत्र मांडून ठेवल्यावर ते भरायचे कशात, यासाठी आपल्या मनातली तयारी जागी होते. आधी वाटत असते, आहे ना ती बॅग चांगली. अरे, किती बॅगा पडल्या आहेत घरात. बसून जाईल त्यात सगळे सामान. असा तुफानी आत्मविश्वास असलेले आपण प्रत्यक्ष त्या बॅगा माळ्यावरून, घरातल्या कुठल्याशा कोप-यातल्या खबदाडातून अनेक दिवसांनी काढतो, तेव्हा सगळी हवाच निघून गेलेली असते आपल्या आत्मविश्वासातली. त्या मळकट, कळकट, चेन न लागणा-या अथवा चेन तुटलेल्या, बंद तुटलेल्या बॅगा बघून हैराण होऊन जातो आपण. किती पैसे खर्च केले होते या बॅगवर. मागच्या एका प्रवासातच हालत पाहा कशी झाली हिची, असे खेदाने म्हणत असतो.

मग, दुस-या बॅगा शोधून बघतो. एकतर आहे त्यात कसेबसे भागवणे, कोणाचे तरी काहीतरी तात्पुरते मागून आणणे, नाहीतर सरळ नवीन वस्तू घरात नव्याने विकत आणून ठेवणे असेच पर्याय मग आपल्यापुढे शिल्लक असतात. असे केल्याने आधीची कमअस्सल गोष्ट घरात साचून राहतेच, पण नव्याने आणखीन काही गोष्टी वेगवेगळ्या कारणांनी घरात येऊन पडतात. काही ट्रॅव्हल कंपन्या बॅगाही गिफ्ट देतात. मग आपण ती नवीच बॅग वापरतो. जुन्या बॅगा, पिशव्या अडगळीच्या साठ्यात आणखीन मागे मागे चालल्या जातात. एकच प्रवास झाल्यावर या नव्यासुद्धा माळ्यावर फेकल्या जातात. आपल्या मनात फक्त 'खूप बॅगा आहेत की घरात पडलेल्या', इतकाच डेटा कोरून पडलेला असतो. प्रत्यक्ष त्यातले एकही सामान चटकन घेतले आणि जसेच्या तसे वापरले, या दर्जाचे उरत नाही. आपण पुन्हा नव्याने नवी खरेदी करत राहतो. प्रवास संपला की, वस्तू पुन्हा वाढत जातात. पुढच्या प्रवासापर्यंत हाताशी काहीच राहत नाही. घरात देखभालीअभावी साचत जाणा-या वस्तूंचे संमेलन तर भरतेच, पण ऐन वेळची धावाधाव काही चुकत नाही.

# पाठदुखी आणि सायटिका

पाठदुखी आणि सायटिका या अत्यंत सामान्यपणे आढळणा-या आरोग्य समस्या आहेत; किंबहुना सर्दीनंतर हेच आजार सर्वाधिक प्रमाणात आढळतात. बहुतेक रुग्णांमध्ये या वेदना कमी कालावधीसाठी असतात. पण, काही रुग्णांना असह्य वेदनांना सामोरे जावे लागते. गंभीर प्रकरणांमध्ये पाठीच्या कण्यातील नसा सुजतात आणि त्यांचा दाह होतो आणि काही वेळा आकुंचन पावतात. त्यामुळे पायांना बधीरपणा येतो आणि अशक्तपणा जाणवतो. अशा परिस्थितीत हालचाल करणे आणि दैनंदिन कामे करणे कठीण होऊन जाते.

**मणक्याचे सखखलन म्हणजे काय :** आपला पाठीचा कणा पाठीच्या कण्याच्या हाडांनी तयार झालेला आहे आणि पाठीचा कणा व मज्जातंतूंच्या आवागमनासाठी तो एक संरक्षक नळी तयार करतो. पाठीच्या कण्याची हाडे मणक्यांनी विभक्त झालेली असतात. मणके हे उशांसारखे किंवा शॉक ॲबसॉर्बिंग पॅड्ससारखे काम करतात. जेव्हा हे मणके फाटतात तेव्हा जेलीसारखे न्यूक्लेअस त्यांच्यातून मोकळे होते आणि ते पाठीच्या कण्याच्या नसांना स्पर्श करते. त्यामुळे प्रचंड वेदना होतात आणि या नसांच्या मार्गातील पायाच्या भागात लहरी उत्पन्न होतात.

उपचार : पाठीच्या कण्याचे सर्जन कदाचित शस्त्रक्रिया करण्यास सांगतील या भीतीने आणि पाठीच्या कण्याच्या शस्त्रक्रियेच्या भीतीने बहुतेक रुग्ण सेल्फ-मेडिकेशन (स्वत:च्या विचाराने औषधे घेणे), योगासने, फिजिओथेरपी आणि इतर उपचारांचा अवलंब करतात. नसांना आलेली सूज आणि दाह कमी झाल्यामुळे त्यांच्यापैकी काहींना दिलासा मिळतो. पण, हा दिलासा केवळ तात्पुरता असतो आणि काही रुग्णांची परिस्थिती अधिक गंभीर होते. त्यावर तातडीने उपचार करण्याची आवश्यकता असते.

समस्येचे गांभीर्य लक्षात घेता, सुरुवातीला औषधांनी व विश्रांतीची शिफारस करून उपचार करण्यात येतात आणि सौम्य प्रकरणांमध्ये व्यायाम सुचविण्यात येतात. मध्यम स्वरूपाच्या वेदना होत असतील, तर नर्व्ह इंजेक्शन्स किंवा स्पायनल इंजेक्शन्स देण्यात येतात आणि पारंपरिक उपचारांना दाद न देणा-या किंवा रचनात्मक बदल करणे आवश्यक असलेल्या काही रुग्णांवर लोकल अनेस्थेशिया देऊन टाकेरहीत एण्डोस्कोपिक शस्त्रक्रिया करण्यात येते.

**टाकेरहीत शस्त्रक्रिया म्हणजे काय :** पाठीच्या कण्याच्या शस्त्रक्रियेत एक क्रांती घडवून आणणारी ही एक दिवसाची शस्त्रक्रिया आहे. या शस्त्रक्रियेत, प्रभावित मणक्यापर्यंत बाजूने स्नायू व ऊती फुगवून एण्डोस्कोप घालण्यात येतो. ही टाकेरहीत शस्त्रक्रिया आहे.


**एण्डोस्कोप आणि लेझर :** एण्डोस्कोपमुळे आतील भागाची परिस्थिती व्यवस्थित कळते. त्यामुळे बाहेर आलेला, सखखलन झालेला किंवा हर्निया झालेला

# आयुर्वेदाच्या सहाय्याने रोग प्रतिकारशक्ती अशी वाढवा

गेली दोन वर्षे जगभरातील लोक रोगप्रतिकारशक्तीची सर्वाधिक चर्चा करित आहेत. कोविड-१९ च्या नंतर अकस्मात आपण आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि उत्तम रोगप्रतिकारक शक्तीच्या फायद्यांविषयी जागरूक झालो आहोत.

आयुर्वेदात रोग प्रतिकारशक्ती म्हणजे कोणतीही परिस्थिती किंवा समस्या हाताळण्याची तुमची शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक क्षमता. फक्त काही गोळ्या घेतल्याने एखाद्याला चांगली प्रतिकारशक्ती मिळू शकत नाही. संतुलित आहार, योग्य निद्रा आणि नियमित व्यायामामुळे रोग प्रतिकारशक्ती निर्माण करता येते किंवा ती वाढवता येते.

हे करण्यासाठी, आयुर्वेदाने दैनंदिन दिनचर्या आणि ऋतुमानाप्रमाणे दिनचर्येबद्दल तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे कारण 'प्रतिबंधात्मक काळजी ही उपचारात्मक काळजीइतकीच महत्वाची आहे.



ऋतुमानाप्रमाणे दिनचर्येमध्ये, आयुर्वेदात म्हटले आहे की पावसाळ्यात बहुतेकांना अशक्तपणा जाणवतो आणि त्याचा प्रभाव त्याच्या पाचनशक्ती किंवा चयापचय क्रियेवर होतो.ज्यामुळे प्रतिकारशक्ती कमकुवत होते. त्यामुळे या काळात प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करण्यासाठी निर्धारित दिनचर्येचे पालन करून विशेष काळजी घ्यायला पाहिजे.


जीवनशैली संदर्भात काही मूलभूत मार्गदर्शक तत्त्वे: रात्री हलका आहार घ्यावा किंवा लवकर जेवण करावे. रात्रीच्या जेवणात कडधान्ये आणि डाळींचा वापर टाळा. आले, लसूण, तुळस , पुदीना या सर्वोत्तम पर्यायांचा वापर तुमच्या जेवणात असायला हवा. जेवणात दालचिनी, लवंग, ओवा, जिरे, काळी मिरी यासारख्या मसाल्यांचा समावेश करणे फायदेशीर आहे. पुदिन्याची पाने, आले, गवती चहाची पात यांपासून बनविलेला चहा दिवसातून दोन वेळा घ्यावा.कापराच्या वड्या तुमच्या बेडरूमच्या कोपऱ्यात, तुमच्या उशीखाली ठेवा.संसर्ग टाळण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता पाळा.संपूर्ण शरीराला तेलाने अभ्यंग (मालिश) करा आणि वेळोवेळी हर्बल वाफारा घ्या.दैनंदिन योगाभ्यास आणि प्राणायाम करा.

# भारताची मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने वाटचाल- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुडी एकाच वेळी राष्ट्राला समर्पित

**मुंबई (प्रतिनिधी)–** निलगिरी युद्धनौका, सूरत विनाशिका आणि वाघशीर पाणबुडीचे लोकार्पण ही नौदलाच्या गौरवशाली परंपरेला भविष्यातील आकांक्षेशी जोडणारी ऐतिहासिक घटना आहे. यामुळे भारताची वाटचाल मोठ्या सागरी शक्तीच्या दिशेने सुरू असून भारताच्या सुरक्षा आणि प्रगतीला मोठे सामर्थ्य प्राप्त झाले असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

भारतात निर्मित सूरत आणि निलगिरी (युद्धनौका) तसेच वाघशीर (पाणबुडी) या तीन महत्वाच्या नौका मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नौसेना प्रमुख दिनेशकुमार त्रिपाठी यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री श्री.मोदी म्हणाले की, संपूर्ण विश्व हा परिवार मानून भारत विकासाच्या भावनेने काम करतोय. तीन आघाडीच्या लढाऊ




जहाजांचा नौदलामध्ये समावेश एक मजबूत आणि स्वावलंबी संरक्षण दल निर्माण करण्यासाठी भारताची अटल वचनबद्धता अधोरेखित करते. भारतीय समुद्र क्षेत्रात भारत प्रथम प्रतिसादकर्ता म्हणून उदयास आला आहे. नौदलाने अनेकांचे जीव वाचवले आहेत आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सुरक्षित केली आहे. यामुळे जगभरातून भारतावर विश्वास वाढला असून आज जागतिक स्तरावर, विशेषत: 'ग्लोबल साउथ'मध्ये भारत एक विश्वासार्ह आणि जबाबदार भागीदार म्हणून ओळखला जातो. तीन युद्धनौकांचे राष्ट्रार्पण सैन्याबरोबरच आर्थिक दृष्टीने सुद्धा महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. जमीन, पाणी, हवा, खोल समुद्र किंवा अनंत अवकाश अशा सर्वच क्षेत्रात भारताने आपले हित जपून तिनही सेनादलांच्या माध्यमातून मागील काही वर्षात आत्मनिर्भर बनण्याची प्रशंसनीय वाटचाल सुरू ठेवली आहे. एकाच वेळी विनाशिका, युद्धनौका आणि पाणबुडी कार्यान्वित होत असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीवर भारतीय नौदलाने स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असल्याचे प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी यावेळी नमूद केले. भारतीय सैनिकांना आता भारतीय युद्ध सामग्री उपलब्ध होत असून १०० हून अधिक देशांना संरक्षण सामग्री निर्यात केली जात आहे. या माध्यमातून 'मेक इन इंडिया' योजनेचा विस्तार होत असून आर्थिक प्रगतीचे दार उघडून भारताच्या तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या प्रक्रियेत मोठा हातभार लागत असल्याचे गौरवोद्गार प्रधानमंत्री श्री.मोदी यांनी काढले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले की, एकाच वेळी तीन युद्धनौका राष्ट्राला अर्पण होत असल्याने भारतीय समुद्री क्षेत्रात देशाची ताकद आणि महत्व वाढले आहे. या क्षेत्रातून मोठे व्यापार होत असून संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर होत आहे. आधुनिकीकरणावर भर देण्यात येत असून या तिनही नौका त्यादृष्टीने सक्षम असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नौदल प्रमुख डमिरल श्री. त्रिपाठी यांनी नौदलासाठी गौरव आणि प्रतिष्ठेचा दिवस असल्याचे सांगून या निमित्ताने शक्ती, क्षमता आणि आत्मनिर्भरता साजरी केली जात असल्याचा उल्लेख केला.

### युद्धनौकांविषयी थोडक्यात

आयएनएस सूरत – हे प्रकल्पातील चौथे आणि अंतिम जहाज आहे असून जगातील सर्वात मोठ्या आणि अत्याधुनिक विनाशिकांपैकी एक आहे. या जहाजामध्ये ७५ टक्के स्वदेशी घटक असून यात अत्याधुनिक शस्त्र–संवेदक प्रणाली आणि प्रगत नेटवर्क–केंद्रित क्षमता आहेत. आयएनएस वाघशीर – स्कॉर्पीन प्रकल्पातील ही सहावी आणि अंतिम पाणबुडी आहे. ही भारताच्या पाणबुडी बांधणीतील वाढत्या कौशल्याचे प्रतिनिधित्व करते. फ्रान्सच्या नेव्हल ग्रुपच्या सहकार्याने ही तयार करण्यात आली आहे. आयएनएस निलगिरी – स्टेल्थ युद्धनौका प्रकल्पातील ही पहिली नौका आहे. भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाईन ब्युरोने याचे डिझाइन केले आहे. यात टिकाऊपणा, समुद्रात स्थिरता आणि स्टेल्थसाठी प्रगत वैशिष्ट्ये आहेत, जी स्वदेशी युद्धनौकांच्या पुढील पिढीचे प्रतिबिंब आहे.




## देवडी येथे राणुबाई देवी यात्रोत्सवास सुरुवात

**वडवणी (प्रतिनिधी):–** तालुक्यातील देवडी येथे पौष पौर्णिमेला राणुबाई देवीचा मोठा यात्रा महोत्सव भरत असतो. या यात्रा महोत्सवासाठी महाराष्ट्रातून हजारो भाविकांतून हजेरी लावतात या यात्रा महोत्सवासाठी बेणाऱ्या व्यापाऱ्यांची व भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांना जागा उपलब्द करून देणे, पाणी लाईट व्यवस्था बाहान पार्किंगची व्यवस्था करून दिली जाते. देवडी येथील ग्रामस्थांच्या वतीने मोठी तयारी केली आहे.

या यात्रा उत्सवामध्ये बुधवारी दुपारी १२ या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. संपूर्ण गावामध्ये छबिना मिरवणूक केली गेली. दरम्यान आज १६ जानेवारी रोजी दुपारी जंगी कुस्त्यांचे सामने व रात्री मनोरंजनपर लोकनाट्य तमाशा मंडळ होणार असल्याचे मच्छिंद्र झाटे यांच्या वतीने सांगण्यात आले. वडवणीपासून उत्तरेस १५ किलोमीटर अंतरावर साडेचार हजार लोकसंख्या असलेले देवडी एक सदन गाव आहे.

## धारूरच्या ऐतिहासिक किल्ल्यावर स्वच्छता अभियान

### नागरिकांसह विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**धारूर (प्रतिनिधी):** शहरातील इतिहासिक किल्ल्यात राजमाता जिजाऊ जयंती निमीत्त महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमेटेडच्या वतीने धारूर येथील ऐतिहासीक किल्ले स्वछता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धारूर शहरातील एमएस–सीआयटी केंद्र व सारथीचे विद्यार्थ्यांनी व शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणे सहभाग घेतले.

महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमेटेड हे संस्था गेल्या २२ वर्षा पासून आयटी क्षेत्रात अग्रेसर आहे. यासंस्था मार्फत विविध प्रकाराच्या सामाजीक व शैक्षणिक कार्य केले जातात. यावर्षी राजमाता जिजाऊ

जयंती निमित्त इतिहासिक 'किल्ले स्वछता अभियान' चे आयोजित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील जेथे किल्ले तेथे स्वछता असे उपक्रम आयोजित केले होते. राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त एमकेसीएलचा पुढाकार घेत किल्ले धारूर येथे किल्ल्यांच्या स्वच्छतेची मोहीम राबवण्यात आली. या अभियानाला काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या विशेष मार्गदर्शनाखाली सुरुवात झाली. स्वच्छता मोहिमेच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून सारथीचे व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र. से.) अशोक काकडे तसेच लातूर विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापकीय संचालक तथा उपजिल्हाधिकारी राहूल जाधव आणि लातूर विभागीय कार्यालयाच्या प्रकल्प अधिकारी ज्योती ढगे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. ही स्वच्छता मोहीम बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील ऐतिहासिक किल्ले धारूर येथे राबवण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून निसर्ग, इतिहास आणि स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत तरुण पिढीला प्रेरित करण्यात आले. पर्यावरणपूरक दृष्टीकोन आणि




ऐतिहासिक वारसाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राबवलेली ही मोहीम प्रेरणादायी ठरली. तसेच एमकेसीएल बीड जिल्हा समन्वयक विठ्ठल पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक सेंटर समन्वयकांनी मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली. या उपक्रमामुळे किल्ल्याच्या स्वच्छते बरोबरच सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला गेला. किल्ले धारूर स्वच्छता मोहिमेने ऐतिहासिक ठिकाणांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी सर्वांना एकत्र येण्याची प्रेरणा देण्यात आली. राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त राबवलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला. या उपक्रमात धारूर शहरातील एमएस–सीआयटी केंद्राच्या संचालक व सारथीच्या विद्यार्थ्यांनी किल्ले स्वछता अभियान सहभाग नोंदवीला.

## कल्याण आखाडे यांची अध्यक्षपदी निवड

**बीड (प्रतिनिधी):** तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोधपणे पार पडली असून फेडरेशनच्या अध्यक्षपदी कल्याण आखाडे यांची तर उपाध्यक्ष म्हणून प्रकाश कवठेकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली आहे.



बीड तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी सावता नागरी पतसंस्थेच्या मुख्य शाखेत विशेष सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली. २०२५.२०३० या कालावधी करता निवड झालेल्या संचालक मंडळामध्ये कल्याण आखाडे व प्रकाश

कवठेकर यांच्यासह लहुराव राऊत, रविंद्र वाघमारे, रघुनाथ खरसाडे, सखाराम शिंदे, सुवर्णमाला संतराम शिंदे, शिवकन्या अशोक राऊत, बालिका संतोष सपकाळ यांचा समावेश आहे. संचालक मंडळाच्या पहिल्या मासिक सभेत रिक्त असलेल्या २ जागांसाठी व स्वीकृत संचालकांच्या २ जागांसाठी निवड करण्यात येणार आहे. या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार अधिकारी म्हणून पी.एस. रोडे यांनी काम पाहिले तर सहकार अधिकारी एस.एल. बेटकर व सावता नागरी पतसंस्थेचे

## गढी महाविद्यालयात नामविस्तार दिन साजरा



**गढी (प्रतिनिधी):** येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील विद्यार्थी विकास, सांस्कृतिक व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रो. डॉ. राणी जाधव तर प्रो. डॉ. सदाशिव सरकटे यांची कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थिती होती. डॉ. राणी जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या नामविस्ताराच्या पाठीमागे असणारा नामांतराचा प्रदीर्घ लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान व वर्तमान स्थितीत शैक्षणिक क्षेत्रात आवश्यक असणारे बदल याविषयी सविस्तर माहिती सांगितली. महापुरुषांच्या नावाने आज अनेक विद्यापीठे आहेत, ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे पण त्यांच्या विचारांचा वारसा चालवणे हे खरे आपल्या पुढील आव्हान असणार आहे असेही प्रो.डॉ. राणी जाधव यांनी सांगितले, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सदाशिव सरकटे यांनी विद्यापीठाच्या उभारणीत व नामविस्तारातील तत्कालीन नेत्यांची भूमिका याविषयी विस्ताराने माहिती सांगून उच्च शिक्षण हे विचारांना प्रबळ करणारे साधन आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक, सामाजिक योगदान हे आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच हा नामविस्तार महत्वाचा ठरतो. आज विद्यापीठात विविध प्रकारची आव्हाने आहेत ती पेलण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले तरच हे विद्यापीठ टिकू शकेल व आज जे त्याचे राष्ट्रीय स्तरावर स्थान आहे ते अबाधित राहू शकेल असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. धर्मराज कटके तर आभार प्रा. डॉ. जयराम ढवळे यांनी केले. यांनी मानले. तर सूत्रसंचालन विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा. हिरा पोटकुले यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभागयांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची गड किल्ल्यावर पद भ्रमंती

**माजलगाव (प्रतिनिधी):–** येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीमध्ये पन्हाळा किल्ला व प्रतापगड किल्ल्यांवर पदभ्रमंती केली. याशिवाय विद्यार्थ्यांनी भौगोलिक, शैक्षणिक, सागरी ठिकाणांचा आनंद देखील घेतला. सदरील सहलीचे आयोजन ९ ते १२ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या वतीने दरवर्षी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी पंढरपूर, नृसिंहवाडी, कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवी दर्शन, कनेरी मठ, शाहू पॅलेस, पन्हाळा किल्ला, नाणीज मठ, गणपतीपुळे, प्रतापगड किल्ला महाबळेश्वर या ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रतापगड व पन्हाळा किल्ल्यांचा इतिहास स्थानिक गाईड कडून जाणून घेतला. याशिवाय गणपतीपुळे येथील समुद्र सफरीचा आनंद घेतला. या सहलीमध्ये डॉ. योगिता होके पाटील, बालासाहेब झोडगे आप्पासाहेब होके, अनंत शेजुळ, मुरलीधर भाळशंकर, माधव घोलप, सय्यद गयास, अनंत राठोड, दत्तात्रय इंगळे, पंकज कळसकर, ज्ञानेश्वर पवार, तुळशीराम साळवे, फरजाना पठाण, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, विशाल सुंदरदे, डिगांबर राऊत यांच्यासह ७० विद्यार्थी सहभागी झाले होते.

## रुग्णमित्र परिवाराच्या वतीने जिल्हा रुग्णालयात तिळगुळ वाटप

बीड (प्रतिनिधी): लोकसेवा मंडळ रुग्णमित्र बीडच्या वतीने जिल्हा रुग्णालयात तिळगुळ वाटप कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात होते. तसेच डॉ. सुभाष जोशी व डॉ. विनोद ओस्तवाल व नारायण पवार व बीड रुग्णमित्र टीम यांची उपस्थित होती. डॉक्टर, नर्स, ब्रदर व रुग्णांना सुद्धा तिळगुळ देऊन मकर संक्रातीचे शुभेच्छा दिल्या. लोकसेवा मंडळ रुग्णमित्र बीडच्या वतीने अनेक उपक्रम राबवण्यात येत असतात. जिल्हा रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना मोठी मदत करण्यात येते.

## नदीप्रमाणे जीवन निर्मळ बनवावे : शैलेश कंगळे

**माजलगाव (प्रतिनिधी):** भौगोलिक संक्रमण व वैचारिक संक्रमण असे दोन प्रमुख संक्रमण आहेत. संक्रमण म्हणजे बदलऱ्या संक्रमण कालाच्या योगावर आपल्यातील प्रत्येकाने बदल करुन घ्यावा, नदी प्रमाणे आपले जीवन निर्मळ व पवित्र आणि प्रवाहित बनवावे असे प्रतिपादन शैलेश कंगळे यांनी केले.

येथील सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात दि १४ जानेवारी मंगळवार रोजी भूगोल दिन संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे, विभाग प्रमुख रवींद्र खोडवे, पर्यवेक्षक सदाशिव ढगे, शिवहरी गिरी, अमोल ठाकुर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना शिवहरी गिरी यांनी मकर संक्रमणा विषयीचे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे म्हणाले की, भौगोलिक संक्रमण व वैचारिक संक्रमण असे




दोन प्रमुख संक्रमण आहेत. संक्रमण म्हणजे बदल. या संक्रमण कालाच्या योगावर आपल्यातील प्रत्येकाने बदल करुन घ्यावा. तिळातील स्नेह म्हणजे प्रेम व गुळातील गोडवा स्वीकारुनच आजच्या दिनी महिला हळदी कुंकवाचा कार्यक्रम करतात. विचारा वाचुन न पविजे समाधान या संत उक्ती प्रमाणे. त्या आपल्या विचाराचे आदान–प्रदान करण्यासाठीच त्याघरोघरी फिरतात. आजपासूनच प्रयागराज येथे कुंभमेळा भारतीय उत्सव परंपरेतील महान उत्सव संपन्न होत आहे. या उत्सवातून आपण एकात्मिकतेचा संदेश घ्यायचा आहे. गंगा यमूना सरस्वती या' पवित्र नद्यांच्या संगमात साधु जन, भक्तजन, स्नान करतात व स्वतःला प्रवाहित करतात. असेही त्यांनी यावेळी सांगीतले. सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## साहित्य संमेलनात राज्यस्तरीय पुरस्काराचे होणार वितरण

**शिरूर (प्रतिनिधी):** सातवे एकता मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्त देण्यात येणारे एकता फाउंडेशनचे राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर झाले असून त्याचे वितरण येत्या १७ व १८ जानेवारी रोजी साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई यांच्या सहकार्याने संपन्न होणाऱ्या संमेलनात करण्यात येणार असल्याची माहिती एकता फाउंडेशनचे कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर व उपाध्यक्ष नितीन कैतके यांनी दिली.

प्रा.डॉ. भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखालील पुस्तक परीक्षण समितीने पुस्तक परीक्षण अहवाल पुरस्कार निवड समितीकडे सुपूर्त केल्यानंतर निवड समितीतील पदाधिकारी तथा एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार यांनी पुरस्कारांची घोषणा केली. कै. विश्वनाथ शंकरराव पवार (से.नि. पोस्टमास्तर) राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार विवेक उगलमुगले (नाशिक) यांच्या 'मनातल्या मनात वाचायच्या कविता' या काव्यसंग्रहास, कै. विश्वनाथ यादव कराड (गुरूजी) राज्यस्तरीय उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार अलकनंदा घुगे–आंधळे (संभाजीनगर) यांच्या 'अर्धा कोयता' आणि उमेश मोहिते (बीड) यांच्या 'खोडा' या कथासंग्रहास विभागून, स्वा. सै. गणपतराव बडे सार्व. वाचनालय लोणी ता. शिरूर का.जि. बीड राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार विठ्ठल खिलारी (सातारा) यांच्या 'सवळा' या कादंबरीस, कै. काशिनाथ आश्रुबा शिंदे (सर) राज्यस्तरीय उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार स्वाती कान्हेगावकर (नांदेड) (नांदे यांच्या 'झाड एक मंदिर' या बालकादंबरीस, कै. वच्छलाबाई बाबासाहेब सानप (आदर्श माता) राज्यस्तरीय उत्कृष्ट ललित साहित्य पुरस्कार निर्मला शेवाळे (मुंबई) यांच्या 'करंजमाळ' या ललित संग्रहास, कै. परमेश्वर भागुजी कैतके (लाईनमन) राज्यस्तरीय उत्कृष्ट संशोधन/संपादन साहित्य पुरस्कार प्रा. रामदास केदार (लातूर) यांच्या 'पटकथा लेखन : तंत्र व कौशल्य' आणि प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार (विजयपूर–कर्नाटक) यांच्या 'पक्षांची दुनिया' या संशोधनपर पुस्तकास विभागून जाहीर झाले आहेत.एकताचे मार्गदर्शक तथा मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगरचे माजी कोषाध्यक्ष, ग्रामीण कथाकार प्रा.डॉ. भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखाली पुस्तक परिक्षण समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. ज्या मद्ये कवितासंग्रह विभाग देवीदास शिंदे (अहिल्यानगर), जयश्री वाघ (नाशिक), नागेश शेलार (बीड), कथासंग्रह विभाग शिवाजी मरगीळ (परभणी), प्रा. डॉ. द्वारका गिते–मुंडे (केज), प्रा. ज्ञानेश्वर हंडरगुळीकर (उदगीर), कादंबरी विभाग प्रा. डॉ. भास्कर बडे (शिरूर कासार), प्रा.डॉ. केशव अलगुले (लातूर), प्रा.रविंद्र कांगणे (नाशिक). बालसाहित्य विभाग प्रा.इम्रान शेख (अहिल्यानगर), प्रा.डॉ. राजश्री तावरे (धाराशीव), लक्ष्मण खेडकर (संभाजीनगर). ललित विभाग प्रा. डॉ. संगिता घुगे (नांदेड), प्रा. उद्धव थोरवे (जालना), ॲड. प्रताप वाघुंबरे (अहिल्यानगर), संशोधन/संपादन विभाग प्रा.डॉ. सुनिता सांगोले (लातूर), प्रो. डॉ. सोपान सुरवसे (बीड), प्रा. डॉ. श्रीहरी धोंड (जालना) यांनी समितीमध्ये परिक्षक म्हणून काम पाहिले.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. सचिन सानप कैलास तुपे, लखुळ मुळे, दिपक महाले, मीरा दगडखैर, ॲड. भाग्यश्री ढाकणे, रंजना फुंदे, डॉ. शोभा सानप, शोभा रांजळे, रंजना डोळे, लता बडे, राजेश बीडकर, महादेव राऊत, कैलास खेडकर, मल्हारी खेडकर, हरिप्रसाद गाडेकर आदींनी केले आहे

## मकरसंक्रातीनिमित्त लाखापासून बनविलेल्या बांगड्याची मागणी वाढली

**परळी (प्रतिनिधी):–** मकर संक्रांतीच्या निमित्ताने एकूणच सर्व हिंदू महिलांमध्ये विशेष रुची आणि आवड असते ती मनपसंत अशा रंगीत बांगड्या लाखेच्या चुडा हाती भरण्याची भारतीय हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रियांच्या साज शृंगाराला विशेष महत्त्व आहे.

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी ठसठशीत कपाळावरचे कुंकू, गळ्यातले मंगळसूत्र अन् हातातला लाखेचा चुडा, हे बाईच्या सौंदर्यात भर पाडणारं विशेष असं लेणं असतं, भारतात आणि प्रामुख्याने महाराष्ट्रात काही ठिकाणी मकर संक्रातीला अखंड सौभाग्याचा वसा घेण्यासाठी लाखेचे चुडे घालण्याची परंपरा आहे. वेगवेगळ्या राज्यात चुड्याचा रंग बदलतो. महाराष्ट्रात हिरवा चुडा, लाखेचा लाल चुडा, उत्तर भारतात पांढरा–लाल चुडा, तर बंगालमध्ये हस्तिदंताच्या बांगड्या असतात. महाराष्ट्रात पंढरपूर, तुळजापूर अशा वेगवेगळ्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी, लाखेचा चुडा घालणे शुभ मानले जाते. सौभाग्यवती स्त्रिया पंढरपुरला श्री पांडुरंग व रुक्मिणी माता यांचे दर्शन घेतल्यावर लाखेचा चुडा घालण्याची पद्धत आहे. पंढरपूरमध्ये दररोज हजारो व यात्रा काळात (वारी) लाखो भाविक दर्शनासाठी येतात. त्यांमधील स्त्री भाविक रुक्मिणीमातेचा आशीर्वाद म्हणून लाखेचा चूडा घालतात. पंढरीची वारी चुड्यांशिवाय पूर्ण होत नाही. बहुसंख्य भाविक स्त्रिया गरीब असतात. त्या पाटल्या, बिल्वर यांची हौस लाखेच्या चुड्यावर पूर्ण करतात. त्या हौसेबरोबर चुड्यांवर अखंड सौभाग्यासाठी श्रद्धादेखील असते. मकर संक्रांतीच्या पावन पर्वावर परळीतील मुख्य मार्गावर अनेक महिला बांगड्या भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केलेले दिसून येत आहे. अनेक महिला आणि पुरुष बांगडी विक्रेत्यांनी मार्गावर आपली दुकाने असून सर्वांच्याच हातावर मोठ्या प्रमाणात बांगड्या भरण्यासाठी गर्दी आहे.

# पाझर तलावात विनापरवाना पाण्याच्या मोटारी टाकल्यास कारवाई

## धावज्याची वाडी,तांदळ्याची वाडी येथील पाझर तलावास भेट देऊन तहसीलदार शेळके यांचे आवाहन

बीड (सरकार) बुधवार १५ जानेवारी रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धावज्याची वाडी येथील तलावास भेट दिली . यावेळी त्यांनी वरील प्रमाणे आवाहन केले . बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व बीडच्या उपविगीय अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयाने सदरची भेट दिली, असे तहसीलदार यांनी सांगितले.

धावज्याची वाडीच्या सरपंच सोनाली काटकर यांनी तहसीलदार यांना पत्र लिहून या पाझर तलावात धावज्याची वाडी , खर्डेवाडी, तांदळ्याची वाडी या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी असून तलावाच्या आजूबाजूचे शेतकरी विनापरवाना तलावात मोटारी टाकुन उपसा करत आहेत , अशा प्रकारची तक्रार दिली होती . विनापरवाना पाण्याचा उपसा होऊ नये,उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी स्वतः भेट देण्याची विनंती त्यांनी केली होती. त्या अनुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ अधिकारी दिपाली आघाव,तलाठी अमोल आधापुरे यांच्यासह धावज्याची वाडी येथील नागरिक , माजी सरपंच महेंद्र काटकर , उपसरपंच विष्णू सांगळे , ग्रामपंचायत सदस्य संजीवन काटे , ग्रामसेवक एन डी सुरवसे , विलास काटे , बंडू तांदळे , उमेश तांदळे , श्रीराम तांदळे , प्रदीप काटे, चक्रधर भोसले,लाईनमन पांडुरंग घरत , चंद्रसेन तांदळे , प्रभू सानप यांच्यासह भेट दिली. भेटी दरम्यान शेळके यांच्या निदर्शनास आले की आजूबाजूचे



काही शेतकरी तलावाच्या क्षेत्रात पाण्याच्या मोटरी टाकण्याच्या तयारीत आहेत . तहसीलदारांनी आजूबाजूच्या सर्व शेतकऱ्यांना बोलवून समज दिली की विनापरवाना जर कोणी पाण्याची मोटर टाकली आणि त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली तर त्यांच्यावर संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. उपस्थित शेतकऱ्यांनी सुद्धा आम्ही विनापरवाना अशा प्रकारे पाण्याची मोटर टाकणार नाही, अशी ग्वाही दिली . उपस्थित लाईनमन यांना तहसीलदार यांनी स्पष्ट सूचना दिल्या की कोणालाही विनापरवाना वीज जोडणी देऊ नये . जर कोणी विनापरवाना वीजजोडणी घेतली तर त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी कारवाई करावी. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी असेही सांगितले की शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे अत्यंत सजग आहेत . दुष्काळ अनुदान यादी असो अथवा रस्त्याचे प्रश्न असो सर्वांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचा प्रशासनाचा मानस आहे , असे जिल्हाधिकारी नेहमी नमूद करत असतात . सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने जिल्हाभरात बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड कार्य करण्याची कार्यवाही सुरू असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा होईल याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आजच आढावा घेतल्याचे तहसीलदार म्हटले .

सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोतावरून गावोगावी पाण्याची व्यवस्था करण्यात येते त्यासाठी अशा ठिकाणी विहिरी खोदल्या जातात . आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी विनापरवाना पाणी उपसा केला नाही तर उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवणार नाही आणि टँकर लावावे लागणार नाहीत . यासाठी सर्वांनीच प्रशासनाला मदत करणे आवश्यक असल्याचे तलाठी अमोल अधापुरे यांनी यावेळी नमूद केले . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्याचा पदभार घेतल्यापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत त्यांनी संवेदनशीलता दाखविली आहे . त्यामुळे ते सर्वांना आपलेसे तहसीलदार वाटू लागले आहेत.

## महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष बीड जिल्हाअध्यक्षपदी विकास गायकवाड यांची फेर निवड

गेवराई (सरकार): डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर या ठिकाणी नामविस्तार दिनानिमित्त महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे पक्षप्रमुख बहुजनांचे नेते संजय भैय्या सोनवणे व मराठवाड्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातील शहीद भीमसैनिकांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर सुभेदारी रेस्ट हाऊस मध्ये झालेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमात वंचित उपेक्षित अल्पसंख्यांक आदिवासी व सर्व बहुजन समाजासाठी व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष रस्त्यावर उतरून काम करत आहे संघटनात्मक बांधणीचा भाग म्हणून.बीड जिल्ह्यातील शोषित पीडितांच्या



हक्कासाठी व सर्व समाज घटकांना सोबत घेऊन चालणारे अभ्यासू नेतृत्व तथा ग्रामपंचायत सदस्य विकास धोंडीराम गायकवाड यांची. बीड जिल्हाध्यक्षपदी.तर कृष्णा प्रधान गेवराई शहराध्यक्षपदी .लक्ष्मण उमाप गेवराई तालुका उपाध्यक्ष.तर अनिल भगत यांची बीड शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली या निवडीबद्दल या सर्व पदाधिकाऱ्यांचे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे सोलापूर जिल्हा अध्यक्ष महेंद्रजी जाधव ठाणे जिल्हाध्यक्ष दुर्गेश भाऊ उघडे इंदापूर तालुका अध्यक्ष अंगद गायकवाड सर पुणे जिल्हा उपाध्यक्ष अनिल कडाळे युवा नेते तुषार भाऊ भोसले कालिदास लुचारे गेवराई शहर व तालुका प्रसिद्ध प्रमुख खाजाभाई शेख

यु चे तालुकाध्यक्ष अमोल बनसोडे विष्णू हातागळे श्रीकांत भालेराव आप्पासाहेब मस्के भिवा हातागळे दत्तात्रेय सौंदरमल इत्यादी पदाधिकारी यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## क्रीडा स्पर्धेत विविध खेळात सहभाग नोंदवण्याचे आवाहन

बीड (सरकार): युवा सप्ताहात दिन्नांक १४ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११.४५ वा. देशभक्तीपर समुहगान स्पर्धा, दि.१५ जानेवारी २०२५ रोजी स्वच्छता दिवस, दि.१६ रोजी सकाळी ११.०० वा.सत्नदिप विद्यालय, उमाकिरण कॉम्पलेक्स, शाहु नगर, बीड येथे निबंध स्पर्धा, दि.१७ रोजी तालुका क्रीडा संकुल मौदान, खंडेश्वरी मंदीर समोर, बीड येथे सकाळी ११.०० वा. सॉफ्टबॉल व बेसबॉल खेळाचे प्रदर्शनीय सामने आयोजित करण्यात आले आहेत, दि.१८ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ११.०० वा. देशामध्ये शांतता राखण्यात युवकांची कर्तव्ये या विषयावर चर्चासत्र, दि.१९ रोजी जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे सकाळी ११.०० वा. चित्रकला स्पर्धाचे आयोजन तर सप्ताहाचा समारोप दि.२१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा क्रीडा संकुल हॉल, बीड येथे करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेमध्ये २१ वर्षाखालील युवक व युवतींन सहभाग घेता येईल. अधिकच्या माहिती करिता कार्यासन अधिकारी रेवनानथ शेलार यांना ९०७५४७६७९१ भ्रमणध्वन्नीवर संपर्क साधावा व जास्तीत जासत युवक युवतींनी युवा सप्ताहानिमीत्त आयोजित विविध स्पर्धा व कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड (सरकार): महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा–या व्यक्तींन्ना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान्न करण्यात येतो.क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणा–या जेष्ठ क्रीडा महर्षीकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडामार्गदर्शकांकरिता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक / जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार ( महिला क्रीडा मार्गदर्शक ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( खेळाडू ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार ( साहसी उपक्रम ), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू ) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासन निर्णय दि.२९ डिसेंबर २०२३ अन्वये दि.२५ जानेवारी २०२४ नुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू, सुधारीत नियमावली २०२३ विहित केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३–२४ या वर्षाच्यापुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू / व्यक्ती यांच्याद्वारा दि.१४ जान्नेवारी ते २६ जान्नेवारी २०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीन्ने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज सादर करणाज्या इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, साहसी उपक्रम व दिव्यांग खेळाडू यांन्नी विहित मुदतीत क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर स्क्रोलिंग लिंक ( Scroll-ing Link ) मध्ये उपलब्ध करून्न दिलेल्या लिंकवर दि. १४ जानेवारी ते २६ जान्नेवारी २०२५ या कालावधीत व दि. २६ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२:०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन्न अर्ज सादर करण्यात यावेत. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी –९६०४९५९६७८ यांच्याशी कार्यालयीन सेवेत संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे, मा. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजीनगर व जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी केले आहे.

## आवश्यक असल्यास रोपांची मागणी विहित वेळेत सादर करण्याचे आवाहन

बीड (सरकार): जिल्हा निहाय एकीकृत म्हणून मौजे चिंचोली माळी रोपवाटिका मौजे शरी रोपवाटिका जिल्हा बीड या दोन रोपवाटिकेस तत्वत: मान्यता प्राप्त झालेली आहे. मान्यता दिलेल्या एकीकृत रोपवाटिकेतून जिल्ह्यातील विविध विभागांना सन २०२५ च्या पावसाळ्यात रोपे पुरवठा करण्यात येणार असल्याचे शासनाचे धोरण आहे.

त्या अनुषंगाने जिल्हानिहाय एकीकृत रोपवाटिकेत तयार करण्यात येणारे रोपे निर्मिती बाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बलप्रमुख) म.रा. नागपूर व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा नागपूर यांनी दिनांक १ जानेवारी २०२५ रोजीच्या व्हीसीद्वारे रोपवाटिका निहाय आढावा घेतला असून जिल्ह्यातील विविध विभाग यंत्रणेच्या मागणीनुसार जिल्हा एकीकृत रोपवाटिकेमध्ये रोपे निर्मिती करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार संबधित विभागामार्फत पुढील वर्षी सन २०२५ च्या पावसाळ्याकरिता रोपे लागवडीकरिता आवश्यक असणारी रोपांची मागणी विभागीय वन अधिकारी, समाजिक वनिकरण बीड या कार्यालयास सादर करावी. रोपे निर्मितीचा कालावधी मर्यादित असून विहित कालावधीत रोप निर्मिती न झाल्यास रोपांवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच सन २०२५ च्या पावसाळ्यात वृक्ष लागवड कार्यक्रमासाठी सुदृढ व उंच रोपे उपलब्ध करून देणे जिकीरीचे ठरणार आहे. तरी सन २०२५ साठी आपल्या विभागास आवश्यक असलेले रोपांची मागणी प्राप्त झाल्यानंतर जिल्हानिहाय एकीकृत रोपवाटिकेत लहान पिशवी व मोठी पिशवीमध्ये निर्मितीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे विविध मंजुरीचा सादर करणे सुलभ होईल, असे सामाजिक वनीकरणाचे विभागीय वन अधिकारी यांनी कळविले आहे.

## महत्वाच्या सण उत्सवासाठी वाद्य वाजविण्याचे दिवस व वेळ निश्चित

बीड (सरकार): पर्यावरण विभागांचे शासन निर्णयानुसार उत्सव कालावधीत १५ दिवस सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी सल्ला मसलत करून दिवस निश्चित करण्याबाबत सूचना केल्यो होत्या आणि जिल्ह्यात दोन्ही प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांचे कार्यालय नसल्याने पोलीस अधीक्षक बीड यांना खालील नमूद केलेल्या दिवशी वाद्य वाजविण्यासाठी परवानगी देण्यास अभिप्राय मागवले असता त्यांनी अनुकूल अभिप्राय सादर केला आहे.

शासन निर्णयानुसार १५ दिवसांसाठी बीड जिल्ह्यात दोन्ही प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ तसेच ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० मधील अटी व शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे नमूद केलेल्या दिवशी १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधी दरम्यान सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीची मर्यादा राखून वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात आली आहे.

सण व उत्सवाचे नाव पुढील प्रमाणे: शिवजयंती १दिवस, ईद–ए–मिलाद १ दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १दिवस १ मे महाराष्ट्र दिन १, दिवस गणपती उत्सव ४ दिवस अनंत चतुर्दशी सह शेवटचे ३ दिवस, नवरात्री उत्सव २ दिवस अष्टमी व नवमी दिवाळी एक दिवस लक्ष्मीपूजन ख्रिसमस एक दिवस ३१ डिसेंबर एक दिवस उर्वरित २ दिवस महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अविनाश पाठक यांनी कळविले आहे.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात भूगोल दिन साजरा करून भूगोल मंडळाचे उद्घाटन

बीड (सरकार): सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भूगोल दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्रोफेसर डॉ.संजय सावते,भूगोल विभाग प्रमुख कालिकादेवी महाविद्यालय,शिरूर कासार हे होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, प्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,विभाग प्रमुख डॉ.बा लासाहेब पोटे,डॉ.ए.डी.चव्हाण,प्रा.सिध्दीकी के.पी , प्रा.आगाम एल.एस. उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रोफेसर डॉ.संजय सावते यांनी भूगोल दिनाचे महत्व पटवून दिले.त्यामध्ये भूगोल दिन १४ जानेवारी ला का साजरा केला जातो. मकर संक्रातीचे महत्व, सी.डी.देशपांडे यांचा जन्म दिवस, भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो.असे



अनेक विषय संशोधनाचे महत्व, गुरू शिष्य परंपरेचे महत्व, भौगोलिक घटकांचे मानवी जीवनातील महत्व, पर्यावरणीय समस्या, शाश्वत विकास म्हणजे काय,जीपीएस , रिमोट सेंसिंग आदी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी भूगोल दिना निमित्त भूगोलाचे महत्व सांगताना म्हणाले की, तारांगण,नैसर्गिक आपत्ती,सूर्याचे भासमान भ्रमण,मकर संक्रांत,जैविक इंधन आणि अक्षय ऊर्जा संसाधन बाबत आणि भविष्यात उदभवणार्या समस्या आणि त्याचे समाधान, पारंपारिक, अपांरपारिक ऊर्जा स्त्रोत याबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.बालासाहेब पोटे यांनी तर सूत्रसंचालन मोनिका राठोड व आभारी शाम पाठक यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बी.ए., एम.ए. भूगोल विषयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



## यशवंत विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

बीड (सरकार): शहरातील यशवंत विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात उत्साहात संपन्न झाले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सुधामतीताई वाघ तर उद्घघाटक म्हणून रोटरी क्लबचे हरीश मोटवानी, तर प्रमुख पाहुणे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम .एस. व यशवंत विद्यालय परिसरातील सर्व गुरुकुलचे संचालक उपस्थित होते.

उद्घाटन कार्यक्रमानंतर शाळेतील इयत्ता बालवाडी पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला .यामध्ये श्लोक, स्वागत गीत ,आमच्या पप्पांनी गणपती आणला, मेरा जूता है जपानी ,नाच रे मोरा ,बम बम भोले ,साउथ इंडियन गाणे, बाहुलीचे लगीन ,आम्ही शिवकन्या ,राधा कैसे न जले, कोई कहे ,साक्षरता गीत, कृष्ण लीला, लल्लाटी भंडार ,येग येग रखुमाई माऊली छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, गोविंदा आला रे, आपलीच हवा, मंगळा गौरी, धडक धडक मल्हारी, जन्म बाईचा, एकविरा आई, लेझी डान्स, कोळीगीत, चले जैसे हवाये, उखाणे, ओ सेठ, विनोदी नाटक ,विनोदी कीर्तन ,मोरया मोरया, पिचली माझी बांगडी ,झुमका वाली पोरं, लेझीम नृत्य इत्यादी बहारदार कलाप्रकार सादर झाले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री मुळे ए.टी .व श्रीमती गर्जे एस.डी. तसेच सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले .



## असे करा हरभऱ्यावरील घाटेअळीचे व्यवस्थापन

बीड (सरकार): सद्यस्थितीत हरभरा हे पिक फुलोरा ते घाटे भरण्याच्या अवस्थेत असून मागील काही दिवसातील ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावरील घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. तसेच अंधाऱ्या रात्रीत घाटेअळीचे पतंग मोठ्या प्रमाणावर अंडी देतात.

या सर्व बाबी घाटेअळीस पोषक असल्यामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. बऱ्याच ठिकाणी या अळीने प्रादुर्भाव करण्यास सुरुवात केली आहे. हि कीड बहुभक्षी असून विशेषतः पीक फुलोरा आणि प्रामुख्याने घाटे अवस्थेत नुकसानकारक असते. लहान अळ्या सुरुवातीला कोवळी पाने, व फुले कुरतडुन खातात. घाटे लागल्यानंतर अळ्या घाटे कुरतडुन त्यास छिद्र पाडुन डोके आत खुपसुन आतील दाणे खातात. साधारणतः एक अळी तीस ते चाळीस घाट्यांचे नुकसान करु शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस्थेतील अळी अवस्था असल्यामुळे वेळीच उपाय योजना केल्यास कमी खर्चात किडींचे प्रभावी नियंत्रण होऊ शकते. या किडीचे खालीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापन करावे. एकात्मिक व्यवस्थापन :– शेतामध्ये इंग्रजी ; आकाराचे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत. घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस ८ ते १० पतंग आढळल्यास किड व्यवस्थापनाचे उपाय योजावेत. हरभरा पीक फुलोरा अवस्थेत असतांना ५० टक्के निंबोळी अर्काची किंवा ३०० पीपीएम झाडीरेक्टीन ५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. अथवा वातावरणात सापेक्ष आर्द्रता पुरेशी असल्यास व्यूहेरीया बॅसीयांना या जैविक बुरशीनाशकाची ६० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे करावी. त्यामुळे घाटेअळीचे नियंत्रण होऊन तिच्या नैसर्गिक शत्रू कीटकांना अपाय न होता घाटेअळीचे नियंत्रण करण्यास मदत होईल. घाटेअळीने आर्थिक नुकसान संकेत पातळी गाठल्यास (सरासरी १ ते २ अळी प्रति मीटर ओळीत किंवा ५ टक्के घाट्यांचे नुकसान)शिफारशीत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा; अन्यथा फवारणी टाळावी. वरील प्रादुर्भाव पातळी गाठल्यानंतर फवारणी केल्यास आपल्या उत्पादनामधील घट टाळून फवारणीचा खर्च भरून निघेल; अन्यथा फवारणीचा खर्च वाया जाऊ शकतो, याची शेतक–यांनी कृपया नोंद घ्यावी. किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालील कोणत्याही एका कीटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून साध्या (नॅपसॅक) पंपाने फवारणी करावी. पावर पंपाने फवारणी करायची असल्यास कीटकनाशकांचे प्रमाण तिप्पट करावे. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी.

अ.क्र कीटकनाशके मात्रा / १० लि.पाणी क्लोरपायरिफॉस २० ईसी किंवा २० मिली किनालफॉस २५ ईसी किंवा २० मिली इमामेक्टीन बेंझोएट ५ एसजी किंवा ४ ग्रॅम,क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ एससी किंवा २.५ मिली ३९;लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ ईसी किंवा १२ मिली नोव्हाल्युरॉन १० ईसी १५ मिली शेतात किटकनाशकाची फवारणी करतांना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा व सुरक्षिततेची योग्य ती काळजी घ्यावी,असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,बीड सुभाष साळवे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)